महाराष्ट्र शासन
महाराष्ट्र लोकसेवा आयोग
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

क्र.३७४(२)/स्थापत्य/२०१९/१९ दिनांक- १० डिसेंबर, २०२१

## -: प्रसिध्दीपत्रक :-

विषय:- महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा-२०१९ च्या मुलाखत कार्यक्रमाबाबत.
संदर्भ:- जाहिरात क्रमांक ०५/२०१९ व अधिसूचना क्रमांक १७/२०१९.

महाराष्ट्र अभियांत्रिकी स्थापत्य सेवा मुख्य परीक्षा - २०१९ च्या लेखी परीक्षेचा दिनांक २३ जुलै, २०२१ रोजी जाहीर करण्यात आलेल्या सुधारीत निकालाद्वारे अर्हताप्राप्त ठरलेल्या पुणे, नाशिक आणि औरंगाबाद केंद्रावरील पुढील टप्प्यातील उमेदवारांच्या मुलाखतीचा कार्यक्रम दिनांक १३ ते १६ डिसेंबर, २०२१ या कालावधीत पुणे, नाशिक आणि औरंगाबाद या केंद्रांवर आयोजित करण्यात आला आहे.

२. दिनांक १८ डिसेंबर, २०२१ रोजी आयोगातर्फे महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा मुख्य परीक्षा-२०२०, ही परीक्षा औरंगाबाद, अमरावती, मुंबई, नागपूर, नाशिक आणि पुणे या केंद्रावर आयोजित करण्यात आली आहे. परीक्षेचा नियोजित दिनांक तसेच दिनांक १३ ते १६ डिसेंबर, २०२१ या कालावधीतील मुलाखत कार्यक्रमामुळे वाहतुकीच्या समस्येमुळे उमेदवारास दिनांक १८ डिसेंबर, २०२१ रोजी आयोजित मुख्य परीक्षेकरीता अडचण निर्माण होण्याची शक्यता आहे. अशा उमेदवारांनी मुलाखत क्रमांक व दिनांक तसेच मुख्य परीक्षेच्या बैठक क्रमांकासह आयोगास मुलाखतीच्या दिनांकापूर्वी so-postexamg1@mpsc.gov.in या ईमेलवर विनंती अर्ज केल्यास अशा विनंतीचा आयोगाकडून गुणवत्तेवर विचार करण्यात येऊन प्रकरणपरत्वे फक्त मुलाखतीचा दिनांक बदलून देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येईल.

ठिकाण- मुंबई.

उपसचिव, परीक्षोत्तर राजपत्रित परीक्षा
महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.